महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ५९ /२०२४ दि. २०/०३/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी**, कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **कल्याण** वाहतूक उपविभागचे हद्दीत मुरबाड रोड ते अंबर वडापाव सेंदर दरम्यान कर्णिक रोड ६० मीटर रस्त्याचे खोदकाम करून कॉक्रिटीकरण करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) मुरबाड रोड येथुन कर्णिक रोडमार्गे प्रवास करणाऱ्या वाहनांना हॉलीकॉस हॉस्पिटल **आधारवाडी चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर रोडवरील प्रवास करणार वाहने हॉलीकॉस हॉस्पिटल जवळील एल.आय.सी. कार्यालय समोरील गल्ली मार्गे मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, कल्याण वाहतूक विभाग, ठाणे शहर यांचे कार्यालयासमोरून लुडस हायस्कूल मॅक्सीग्राउंड दरम्यान जाणाऱ्या रोडने प्रवास करून इच्छीत स्थळी जातील किंवा आयकर विभाग समोरील चर्चच्या बाजूलगत रोडने प्रवास करून इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) संतोषी माता रोडवर असलेले अंबर वडापाव सेंटर समोरील बालाजी फ्रुट सेंटर समोरून कर्णिक रोड कडे जाणाऱ्या वाहनांना **बालाजी फ्रुट सेंटर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर रोडवरून प्रवास करणार वाहने लुडस् हायस्कुल कर्णिक रोड येथून उजवे वळण घेवून इच्छीत स्थळी जातील किंवा सरळ पुढे जावून आयुक्त बंगल्याजवळ उजवे बाजूस, सरळ, डावे बाजुस वळण घेवून इच्छीत स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. २१/०३/२०२४ रोजीपासून १ महिन्याकरीता २४ तास वर नमूद काम पूर्ण होईपर्यत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.

CamScanner

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

प्रत कार्यवाहीसाठी :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व प्रभारी अधिकारी, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner